ऑनलाईन फी भरण्यासाठी मार्गदर्शक सूचना

ऑनलाईन रजिस्ट्रेशनकरीता अर्ज करण्यापूर्वी अर्जदाराने प्रथम मार्गदर्शक सूचना वाचून समजून घ्याव्या.
नोंदणी व इतर शुल्क भरण्यासाठी SBI Portal चा वापर करावा. लिंक पुढीलप्रमाणे :-
https://www.onlinesbi.com/sbicollect/icollecthome.htm?corpid=845584

- अर्जदारानी योग्य ठिकाणी आपली संपूर्ण माहिती ऑनलाईन पंजीकरण अर्जात काळजीपूर्वक भरावी. अर्जदारास एकाचवेळी संपूर्ण माहिती भरता आली नाही किंवा त्यास /तिस भरलेली माहिती तपासून पहावयाची असल्यास ती जतन करता येईल. माहिती जतन झाल्यावर संगणक प्रणालीद्वारे लॉग-इन आयडी आणि पासवर्ड तयार होईल व तो स्क्रिनवर दिसेल. अर्जदारानी लॉग-इन आयडी आणि पासवर्डची नोंद करून घ्यावी. सदर लॉग-इन आयडी आणि पासवर्ड ई-मेल आणि एस्.एम्.एस् द्वारा अर्जदारास कळविण्यात येईल. लॉग-इन आयडी आणि पासवर्डचा वापर करून अर्जदारास आवश्यक असल्यास माहिती अद्ययावत करता येईल. संपूर्ण माहिती बरोबर भरली असल्याची खात्री करून घ्यावी आणि सबमीटचे (submit) बटण दाबावे.
- अर्ज पूर्ण भरल्यावर आणि आवश्यक कागदपत्रांच्या प्रती अपलोड केल्यावर अर्जदाराने ( Proceed for payment ) या ऑनलाईन ॲप्लीकेशनमधील शेवटी असलेल्या बटणावर क्लिक करावे.
- अर्जदाराने ( Proceed for payment ) या बटणावर क्लिक करण्यापूर्वी एकदा संपूर्ण माहिती भरली असल्याबाबत खातरजमा करावी. **ऑनलाईन अर्ज सादर झाल्यावर कोणताही बदल करता येणार नाही.**
- अर्जाच्या प्रकारानुसार भरावयाच्या शुल्काचा संपूर्ण तपशिल दिसेल. अर्जदाराने SBI Portal एकूण किती शुल्क भरावयाचे आहे याची नोंद घ्यावी.
- Payment details page वरभरावयाच्या शुल्काचा संपूर्ण तपशिल दिसेल. अर्जदाराने SBI Portal एकूण किती शुल्क भरावयाचे आहे याची नोंद घ्यावी.
- (Pay) बटणवर क्लिक केल्यावर SBI Portal वर आपोआप जाल. पुढील सूचनांचे अनुपालन करून शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण करा
- अर्जदाराने स्क्रिनवर दिसत असलेल्या सर्व अटी-शर्ती मान्य केल्या पाहिजेत. चेंक बॉक्सवर क्लिक करा व पुढे जा.
- आता परिषदेचा लोगो, नांव आणि पत्ता दिसेल.
- Registration Fee हा पर्याय निवडा.
- अर्जदाराने स्वतःचे नांव , जन्मतारिख, मोबाईल क्रमांक , ई-मेल , रजिस्ट्रेशन फी रक्कम ही माहिती भरावी.

- स्क्रिनवर विचारलेली माहिती देऊन मास्टर / व्हिसा डेबिट किंवा क्रेडीट कार्ड अथवा इंटरनेटद्वारे शुल्क जमा करावे.
- शुल्क भरण्याची प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर दहा अंकी संदर्भ क्रमांक प्राप्त होईल. पुढील कामकाजासाठी हा संदर्भ क्रमांक नोंद करावा. (उदा. DUXXXXXXXX)
- शुल्क भरण्याची प्रक्रिया व्यवस्थित पूर्ण न झाल्यास "your online transaction was unsucceseful. Please repeat the process again until Reference number is generated" असा मेसेज येईल. वरील प्रक्रिया संदर्भ क्रमांक येईपर्यन्त पुन्हा करावी.
- शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर ई-रिसीट तयार होईल.
- ई-रिसीटचे प्रिन्ट घ्या.
- ई-रिसीट तयार झाल्यावर , अर्जदाराने http://online.mspcindia.org वर लॉग-इन करावे व पेमेन्ट डिटेल्स भरावे.
- अर्जदाराला संगणक प्रणालीद्वारे पेमेन्ट डिटेल्स या विभागाकडे निर्देशित केल्यानंतर पेमेन्ट डिटेल्सबाबत संदर्भ क्रमांक , फीची रक्कम इ. तपशील भरण्याची मागणी केली जाईल.
- शुल्क आदा केल्यानंतर संगणक प्रणालीद्वारे अर्जदारास त्याच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी परिषद कार्यालयातील भेटीचा दिवस निश्चित करण्याच्या विभागाकडे निर्देशित केल्यानंतर त्याने त्याच्या सोयीने निवड करावी.

टिप : पेमेन्टची माहिती भरल्यानंतर ऑनलाईन ॲप्लीकेशन फॉर्म सबमीट केल्यावर सर्व्हरकडून पुढील माहिती येईपर्यन्त वाट पहा, दुप्पट शुल्क भरणा टाळण्यासाठी कोठेही बॅक , रिफ्रेश बटन प्रेस करू नये. अर्जदाराने पेमेन्ट डिटेल्समध्ये दर्शविल्याप्रमाणेच शुल्क जमा करावयाचे आहेत अन्यथा अर्ज रद्द होईल किंवा पुन्हा माहिती भरण्यासाठी मागे जाईल व त्यामुळे पुढील कार्यवाहीस उशीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

फी दरपत्रक :

| तपशिल | शुल्क |
|---|---|
| अर्ज शुल्क (फॉर्म फी) | रु. २५/- |
| पंजीकरण फी (रजिस्ट्रेशन फी) | रु. १००/- |
| पोस्टेज | रु. १००/- |
| फार्मासिस्ट प्रोफेशनल प्रोफाईल चार्जेस | रु. २००/- |
| सेवा आकार | रु. ५००/- |
| डीआयसी पब्लिकेशन्स (ऐच्छिक) | रु. २५०/- |
| अतिरिक्त शैक्षणिक अर्हता शुल्क लागू असल्यास (प्रत्येक वाढीव | रु. ५०/- |

| | |
|---|---|
| अर्हतेसाठी) | |
| नावात बदल (लागू असल्यास) | रु. २०/- |

पंजीकरण नुतनीकरणासाठी - महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद नियम १९६९ नुसार अर्जदार पंजीकरण नुतनीकरणासाठी खालील तीन पर्यायापैकी एक निवडून आगाऊ शुल्क भरू शकतो ( Advance Renewal Fees in lump sum- ARFL). सध्या पंजीकरण नुतनीकरण शुल्क एक वर्षासाठी रु.५०/- असून त्यानुसार पर्याय देण्यात आले आहेत. भविष्यात फी वाढ झाल्यास ARFL शुल्कमध्ये बदल संभवतो.

ARFL- Rs. 1500/- तीस वर्षांचे नुतनीकरणासाठी

ARFL - Rs. 1000/- वीस वर्षांचे नुतनीकरणासाठी

ARFL - Rs. 500/- दहा वर्षांचे नुतनीकरणासाठी

**मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी वेळ निश्चित करून घेण्यासाठी मार्गदर्शक सूचना**

ऑनलाईल पोर्टल मार्फत मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी_वेळ निश्चित करण्याची प्रक्रिया पेमेन्ट डिटेल्स भरल्यानंतरच सुरू होईल.

स्क्रिनवर दर्शविलेल्या उपलब्ध दिनांकास व उपरोक्त वेळेमध्येच सदर वेळ निश्चित करता येईल.

अर्जदाराने पेमेन्ट डिटेल्स भरले परंतू वेळ निश्चित केली नाही तर वेळनिश्चितीसाठी लिंक उपलब्ध राहील.

वेळ निश्चितीची माहिती त्यातील तपशिलासह दिसेल.

प्रिन्ट ॲप्लीकेशन बटणवर क्लिक करा. फॉर्म नं. ८ ॲप्लीकेशन फॅार्म ज्यामध्ये अर्जदाराची संपूर्ण माहिती, पेमेन्ट डिटेल्स आणि भेटीची वेळ निश्चिती तपशिल छापला जाईल.

अर्जदार पहिली वेळ ठरविल्यापासून एक महिन्याच्या कालावधीत दोन वेळा आपल्या पडताळणीची वेळ बदलून घेऊ शकतो. दोन वेळा पडताळणीची वेळ ठरविल्यानंतर किंवा एक महिन्याचा कालावधी संपल्यानंतर भेटीची वेळ ठरविण्यासाठी संगणक प्रणाली अर्जदारास मदत करू शकणार नाही.

पडताळणीची वेळ निश्चित केल्यावर अर्जदारास सर्व मूळ कागदपत्र त्यांच्या एकेक छायाप्रतीसह व फॉर्म ८ चे प्रिन्टआऊट घेऊन परिषदेच्या कार्यालयात हजर राहणे आवश्यक आहे. पत्ता पुढीलप्रमाणे :- **महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद ,** ४था मजला , आर स्क्वेअर,राज्य कामगार विमा योजना रुग्णालयासमोर, लाल बहादूर शास्त्री मार्ग , मुलुंड प. मुंबई-४०००८०.